N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** लक्ष्मीपूरी **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0175 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/06/2019 05:00 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 व 7 (अ) |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 24/06/2019

**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/06/2019

**Time From (वेळेपासून):** 20:20 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 20:29 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/06/2019 **Time (वेळ):** 04:27 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 007 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/06/2019 04:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 0.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे व ,पदमा टाँकीज समोरील परीसरामध्ये,कौल्हापुर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** गजानन राजाराम भोसले

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

**(c) Date/Year of Birth (जन्म** 1954 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॉट नं5,श्रीकष्ण कॉलनी,संभाजीनगर ,कोल्हापुर,जुना राजवाडा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लॉट नं5,श्रीकष्ण कॉलनी,संभाजीनगर ,कोल्हापुर,जुना राजवाडा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजीज रमजान शेख | | | 1. अष्टेकर नगर,झुम प्रकल्पाशेजारी,लाईन बाजार कोल्हापुर,शाहुपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | दाऊद बाबालाल पाटणकर | | | 1. चांदणी चौक रविवार पेठ,कोल्हापुर, लक्ष्मीपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

मी श्री. गजानन राजाराम भोसले, वय 65, व्यवसाय - सुखवस्तु, विदर्भ कोकण ग्रामीण बंकेतुन रिटार्यड, रा. शिवनेरी, प्लॉट नं. 5, श्रीकृष्ण कॉलनी, संभाजीनगर, कोल्हापूर, मोबाईल नंबर-7774045129, समक्ष फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर माझे कुटूंबासह एकत्रित राहणेस आहे. मी सन 2015 मध्ये विदर्भ कोकण ग्रामीण बंकेतुन सेवानिवृत्त झालो आहे. मी दिनांक 24/06/2019 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर येथील कार्यालयामध्ये जावून पोलीस उपअधीक्षक श्री. बुधवंत यांची प्रत्यक्ष भेट घेतली व लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेतील पोलीस शेख यांचेविरुध्द लाच मागणीबाबत माझी तक्रार असलेचे सांगून लाच मागणीचे अनुषंगाने त्यांचेविरुध्द कारवाई होणेकरीता माझा तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. त्यावेळी त्यांनी त्यांचे कार्यालयातील पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र पाटील यांना बोलुन घेवुन त्यांना माझी तक्रार सांगितली व माझा तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. त्या अर्जातील मजकूर असा की, मी सौभाग्य फायनान्स कंपनी प्लॉट खरेदी विक्रीकरीता कर्ज देणेबाबत जाहिरात पाहुन संबंधित कंपनीचे श्री. गोरख शर्मा यांचेशी संपर्क साधला होता. श्री. शर्मा यांना मी माझे नियोजित प्रकल्पाचा अहवाल ई-मेलवर पाठविला होता. त्यावर संबंधित कंपनीने माझा अहवाल पाहुन साधारण 8 कोटी 40 लाखाचे कर्ज मंजुरीचे पत्र मला मेलव्दारे प्राप्त झाले होते. त्यानंतर संबंधित कंपनीने माझेकडे वेळोवेळी प्रकल्पासाठीचे विविध चार्जेस म्हणुन 22,37,980/- रू. भरून घेतले होते. त्यानंतरही माझे कर्ज मंजुर झाले नाही व कंपनीकडुन माझेकडे दुर्लक्ष केले जावु लागल्याने माझी फसवणुक झालेची खात्री झाली. त्याबाबत मी लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे दि. 10/08/2018 रोजी रितसर तक्रार देवुन फसवणुकीबाबत गुन्हा नं. 172/2018 प्रमाणे नोंद केला होता. सदर गुन्ह्याचा तपास हा लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेचे पीएसआय श्री. पवार यांचेकडे आहे. माझे तक्रारीप्रमाणे दाखल केलेल्या गुन्ह्यातील आरोपी हे बाहेरील राज्यातील असलेने त्यांचा शोध घेवुन त्यांना अटक करणेसाठी लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेचे अधिकारी/कर्मचारी टाळाटाळ करीत होते.दि. 24/06/2019 रोजी मला लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेचे पीएसआय पवार यांचा मेसेज आलेवर मी त्यांना फोन केला असता श्री. पवार यांनी तक्रारदार यांना त्यांचे फसवणुकीचे गुन्ह्यासंदर्भात चर्चा करणेसाठी पोलीस ठाणे येथे येवुन भेटणेस सांगितले. त्याप्रमाणे मी पोलीस ठाणे येथे गेलो असता माझी पीएसआय पवार यांचेशी भेट झाली नाही. तेथील पोलीस शेख यांनी माझी यांची भेट घेवुन मी दाखल केलेल्या गुन्ह्यातील आरोपी दिल्ली येथे असुन तेथे जावुन त्यांचा शोध घेवुन त्यांना अटक करणेसाठी खर्च होणार आहे. आम्ही तपास पथकासह दिल्ली येथे जाणार आहोत त्यासाठी लागणारा खर्च म्हणुन 25,000/- रू. द्यावे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केलेने त्यांचेवर कारवाई होणेस विनंती अर्ज केला आहे. त्यादरम्यान पोनि पाटील यांनी उप अधीक्षक, भुमी अभिलेख, करवीर यांचेशी कार्यालयाशी पत्रव्यवहार करून दोन शासकीय पंच

उपल्बध करून घेतले. ते पंच कार्यालयात आलेवर श्री. पाटील यांनी आपली व माझी त्यांचेशी ओळख करून दिली. त्यामध्ये पंच नं. 1 म्हणुन श्रीमती वैशाली निकम व पंच नं. 2 म्हणुन श्री. रोहन शिंदे हे काम करणेस तयार झाले. त्यानंतर माझा तक्रारी अर्ज श्री.पाटील यांनी वाचून पाहिलेवर मला माझी तक्रार पंचांना सांगणेची सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर श्री.पाटील यांनी माझी लेखी तक्रार पंचांना वाचावयास दिली. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असलेची पंचांची खात्री झाली. त्यानंतर श्री.पाटील यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचांनी माझे लेखी तक्रारीखाली सह्या केल्या. तसेच श्री. पाटील यांनी देखील तक्रारीवर सही केली. त्यानंतर पोनि पाटील यांनी आपले कार्यालयातील इतर कर्मचारी यांना केबीनमध्ये बोलवुन घेवुन माझी व पंचांची ओळख करून देवुन माझी तक्रार थोडक्यात सांगितली. दरम्यान मला माझे मोबाईलवर पोलीस उपनिरीक्षक पोवार यांचा फोन आला व त्यांनी मला पोलीस ठाणेमध्ये जावुन पोलीस शेख यांची भेट घेण्यास सांगितले. त्यानंतर श्री.पाटील यांनी पोलीस शेख यांचे लाचेचे मागणीचे पडताळणीसाठी माझे गळयात डिजीटल व्हईस रेकर्डर अडकवुन पंच श्रीमती निकम यांचेसह मला 18.09 वा लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे पाठविले. तेथे पोलीस शेख यांची भेट घेतली. त्यावेळी त्याठिकाणी दाऊद पाटणकर हा चहावाला तेथे आला. पोलीस शेख यांनी माझे तक्रारीप्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपींचा दिल्ली येथे तपास पथकासह जाणेसाठी तपास पथकासाठी खर्चापोटी म्हणुन पोलीस शेख यांनी 25,000/- रू. मागणी करून ती रक्कम चहावाला दाऊद यांचेकडे देणेस सांगितले. त्यावेळी चहावाला दाऊद पाटणकर याने देखील माझेकडे पैशाची मागणी करून 25,000/- रू. रक्कम पद्मा टकीजजवळ चहाचे गाडीवर घेवुन येण्यास सांगितले. त्यानंतर मी पंच श्रीमती निकम यांचेसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर चे कार्यालयात परत आलेवर पोनि पाटील माझे गळयात अडकविलेला डिजीटल व्हईस रेकर्डर काढुन घेवून तो त्यांनी 18.52 वा. बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर पोनि पाटील यांनी प्रथम पंच श्रीमती निकम यांचकडे व त्यानंतर माझेकडे पोलीस शेख यांचे लाचेचे मागणीबाबत विचारपुस केली. तसेच पोलीस शेख व माझेत झालेले डिजीटल व्हईस रेकर्डरवर ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावरून पोलीस शेख यांनी माझेकडे 25,000/- रू. लाच रक्कम मागणी करून ती लाच रक्कम चहावाला दाऊद पाटणकर याचेकडे देण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले. त्यानंतर थोडयावेळाने पोनि पाटील यांनी मला व दोन्ही पंचांना परत केबीनमध्ये बोलवुन घेवुन सापळा पुर्व पंचनामा सुरु करून मला व दोन्ही पंचांना अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट बटरीचे गुणधर्म सांगितले. पोनि पाटील यांचे सुचनेनुसार मी पोलीस शेख यांना देण्यासाठी लाच रक्कम हजर केली. मी हजर केलेल्या लाच रक्कमेतील नोटांना पोहेक सौंदत्ती यांनी अँथ्रासिन पावडर लावुन ती लाच रक्कम माझे शर्टचे खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचायांना सापळ्याचे अनुषंगाने पोनि पाटील यांनी योग्य त्या सुचना देवुन दाऊद याने लाच रक्कम स्विकारलेचा इशारा म्हणुन मी माझे पन्टचे खिशातील रूमाल डाव्या हाताने काढुन तोंडवरून फिरवावा म्हणजे दाऊद याने लाच रक्कम स्विकारल्याचे समजण्यात येईल असे सांगितले. पोलीस शेख यांनी लाच रक्कम चहाच्या गाडीवर दाऊदकडे देण्यास सांगितलेने पोलीस शेख यांना व चहावाला दाऊद यास एकावेळी पकडयासाठी पोलीस उपअधीक्षक बुधवंत व पोनि पाटील यांनी त्यांचे स्टाफमध्ये दोन टीम तयार केल्या. त्यामधील पोनि पाटील यांची एक टीम व पंच नं. 2 शिंदे हे माझे व पंच श्रीमती निकम यांचे पाठोपाठ पद्मा टकीज समोर येणार असल्याचे व पोलीस उपअधीक्षक बुधवंत यांची दुसरी टीम ही चहावाला दाऊद याने लाच स्विकारलेवर पोलीस शेख यांना ताब्यात घेण्यासाठी लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेमध्ये जाणार असल्याचे पोनि पाटील यांनी मला सांगितले. त्यानंतर पोनि पाटील यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर अडकवुन मला व पंच श्रीमती निकम यांना माझेकडील प्लेझर मोपेडवरुन खाजगी इसम दाऊद पाटणकर यांची भेट घेणेकरीता 20.20 वा लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेजवळील पद्मा टकीजसमोर पाठविले. आमचे पाठोपाठ याआधी ठरविलेप्रमाणे दोन टीम तयार करून पोलीस उपअधीक्षक बुधवंत, पोनि पाटील व त्यांचेकडील स्टाफ व पंच नं. 2 शिंदे हे त्यांचेकडील खाजगी दुचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूरचे कार्यालयातुन बाहेर पडले होते. आम्ही पद्मा टकीज समोर गेल्यावर माझी मोपेड थांबविली. तेव्हा पोनि पाटील, पंच व त्यांचे सोबतचा स्टाफ असे त्यांचेकडील खाजगी दुचाकी वाहनावरून तेथेच पद्मा टकीजजवळ येवुन थांबुन राहीले. मी दाऊद पाटणकर याला त्याचे चहाचे गाडीजवळ जावुन भेटलो असता, आमचेमध्ये माझे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी दाऊदने माझेकडे लाच रक्कमेची मागणी केलेवर मी त्याला लाच रक्कम माझे उजवे हाताने काढुन दिली. त्यावर दाऊदने सदरची लाच रक्कम स्विकारून आपले दोन्ही हातांनी मोजली व पन्टचे समोरील डावे बाजुचे खिशात ठेवली. तेव्हा मी पोनि पाटील यांचे सुचनेप्रमाणे दाऊदने लाच रक्कम स्विकारलेचा इशारा म्हणुन माझे पन्टचे खिशातील रूमाल डावे हाताने काढुन तोंडवरून फिरवला. त्यादरम्यान खाजगी इसम दाऊदला त्याचे बहिणीचा फोन आलेने गडबड करून त्याने स्विकारलेली लाच रक्कम परत माझे शर्टचे खिशामध्ये कोंबली. त्याचवेळी पोनि पाटील व त्यांचे स्टाफने खाजगी इसम दाऊद याला पकडले. त्यानंतर पोनि पाटील यांनी माझे गळ्यात अडकविलेला डिजीटल व्हईस रेकर्डर काढुन घेवून तो त्यांनी 20.29 वा. बंद करून ताब्यात घेतला. त्याचवेळी पोलीस उपअधीक्षक बुधवंत यांचे दुस-या टीमने पोलीस शेख यांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर पोनि पाटील व त्यांचेकडील स्टाफने खाजगी इसम दाऊद याला लक्ष्मीपुरी पोलीस ठाणेमध्ये घेवुन गेले. तेथे पोनि पाटील व त्यांचे स्टाफने दाऊद याचे हाताची तपासणी करून पाहिली व माझे फिर्यादीवरून दाखल गुन्हयासंदर्भाची कागदपत्रे प्राप्त करून घेतली. त्यानंतर मला माझे मोपेडने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूरचे कार्यालयात येण्यास सांगुन पोलीस उपअधीक्षक बुधवंत, पोनि पाटील व सोबतचा स्टाफ त्यांचे खाजगी मोटर सायकलने व पोलीस शेख व खाजगी इसम पाटणकर यांना घेवुन काही कर्मचारी शासकीय टाटा सुमोने कार्यालयामध्ये आले. त्यावेळी पोलीस शेख यांचे नाव - श्री. अजीज रमजान शेख, पोलीस हवालदार ब.नं. 1068, नेम. लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर व खाजगी इसम दाऊद यांचे नाव - श्री. दाऊद बाबालाल पाटणकर, वय 43, खाजगी इसम, रा. चांदणी चैक, रविवार पेठ, कोल्हापूर असे असलेचे समजले. एकंदरीत पोलीस शेख यांनी माझे फिर्यादीवरून दाखल गुन्हयातील आरोपींचा शोध घेणे तपास पथकासह दिल्ली येथे जावुन त्यांना अटक करणेसाठी तपास पथकाचा खर्च म्हणुन माझेकडे 25,000/- रू. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम करून लाच रक्कम यातील खाजगी इसम दाऊद पाटणकर यांचेकडे देण्यास सांगितले. त्याचप्रमाणे दाऊदनेही माझेकडे लाच रक्कमेची मागणी करून ती रक्कम पद्मा टाकीज चैकात असलेल्या चहाच्या गाडीजवळ घेवुन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे माझे फसवणुकीचे गुन्हयातील आरोपींताचा शोध घेण्यासाठी दिल्ली येथे जाणेसाठी म्हणुन खाजगी इसम पाटणकर याने माझेकडुन रु. 25,000/- लाच रक्कम स्विकारली असता त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर येथील पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र पाटील व त्यांचे स्टाफने पकडले आहे. तरी नमूद प्रकरणी माझी अजीज रमजान शेख, वय 52, पोलीस हवालदार ब.नं. 1068, नेम. लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर, व दाऊद बाबालाल पाटणकर, वय 43, खाजगी इसम, रा. चांदणी चैक, रविवार पेठ, कोल्हापूर या दोघांचेविरुध्द लाचेची मागणी करून स्विकारल्याबाबत फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): VASANTRAO DADASO BABAR(I (Inspector)) / PBMH75973 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): VASANTRAO DADASO BABAR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH75973

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | मजबुत | 165.1-167.64 | गव्हाळ वर्ण | चेहरा का प्रकार: उभा/अंडाकृती<br>माथा: साधारण कपाळ<br>होंठ: साधारण ओठ<br>नाक: साधारण नाक<br>दांत: साधारण दात<br>चेचक के दाग: NO<br>बोली: साधारण |
| 2 | पुरुष | | मजबुत | 162.56-165.1 | गव्हाळ वर्ण | चेहरा का प्रकार: उभा/अंडाकृती<br>माथा: साधारण कपाळ<br>होंठ: साधारण ओठ<br>नाक: साधारण नाक<br>मूछे: बारीक/पेन्सिल सारखे कट/तलवार क<br>दाढ़ी: लांब -घनदाट<br>दांत: साधारण दात<br>चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | साधारण दात | | नेत्रहीन: नाही<br>भौंह का आकार: साधारण<br>भौंह की मोटाई: साधारण<br>आँखों का रंग: काळेभोर<br>आँखों के प्रकार: साधारण<br>चश्मा प्रकार: चष्मा नाही<br>भेंगा: नाही<br>चश्मे का प्रयोग : नाही | | बाहरी तल: फुल पॅन्ट<br>बाहरी शीर्ष: फुल बाहयांचा शर्ट |
| | साधारण दात | | नेत्रहीन: नाही<br>भौंह का आकार: साधारण<br>भौंह की मोटाई: साधारण<br>आँखों का रंग: काळेभोर<br>आँखों के प्रकार: साधारण<br>चश्मा प्रकार: चष्मा नाही<br>चश्मे का प्रयोग : नाही | | बाहरी तल: फुल पॅन्ट<br>बाहरी शीर्ष: फुल बाहयांचा शर्ट |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**